# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६.**

ई-मेल: **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट www.mercindia.org.in

## जाहीर नोटीस

### अपील क्र. २००७ चे १२५ आणि क्र. २००७ चे १२६ मध्ये विद्युत अपील न्यायाधिकरणाने, उच्च दाबाने वीज पुरवठा होत असलेल्या मल्टीप्लेक्स, शॉपिंग मॉल्सना एलटी-९ वर्गवारी लागू करण्याच्या संदर्भात दिनांक २६-११-२००७ च्या आदेशान्वये दिलेले निदेश

प्रकरण क्र. २००७ चा ७८

मेसर्स इनऑर्बिट मॉल (इंडिया) प्रा. लि. आणि मेसर्स वासुदेव सी. वधवा कन्स्ट्रक्शन्स यांनी, विद्युत अपील न्यायाधिकरण, नवी दिल्ली, यांच्यापुढे, अनुक्रमे अपील क्र. २००७ चे १२५ आणि क्र. २००७ चे १२६ दाखल केले होते. मेसर्स रिलायन्स एनर्जी लिमिटेडच्या पुरवठा क्षेत्रातील, मल्टीप्लेक्सेस आणि शॉपिंग मॉल्स ज्यांचे पूर्वी उच्च-दाब-२ वर्गवारीखाली वर्गीकरण करण्यात आले होते त्यांच्या बाबतीत वीज दराची लघु-दाब-९ वर्गवारी लागू करण्याकरिता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २६ जुलै, २००७ रोजी काढलेल्या शुध्दीपत्रकाविरुध्द हे अपील होते. विद्युत अपील न्यायाधिकरणाने त्यांच्या दिनांक २६-११-२००७ च्या निकालाने आणि आदेशाने सदर अपील निकाली काढली आहेत. सदर आदेशात अपील न्यायाधिकरणाने आयोगास असे निदेश दिले आहेत की, वर नमूद केलेल्या दोन्ही अपीलकर्त्यांना लघु-दाब-९ वर्गवारी मधील मल्टीप्लेक्सेस आणि शॉपिंग मॉल्स ज्यांना उच्च दाबाने वीज पुरवठा होत आहे, ते देखील अन्य विद्युत ग्राहकांप्रमाणे त्याच वर्गवारीमध्ये मोडतात किंवा कसे याबाबत त्यांना त्यांचे म्हणणे आयोगापुढे मांडण्याची एक पूर्ण संधी देऊन मगच वीज दराची लघु-दाब-९ वर्गवारी लागू करण्याबाबत एक नवीन आदेश पारित करावा. अपील न्यायाधिकरणाने असे मत व्यक्त केले आहे की, त्यांच्यासारख्या सर्वच ग्राहकांना वरील दोन अपीलकर्त्यांबरोबरच त्यांचेही म्हणणे मांडण्याची संधी देऊन आयोगाने या प्रश्नाचा नव्याने विचार करावा.

मेसर्स इनऑर्बिट मॉल (इंडिया) प्रा. लि., मेसर्स वासुदेव सी. वधवा कन्स्ट्रक्शन्स आणि आयोगाच्या दिनांक २४-०४-२००७ च्या आदेशाप्रमाणे, मेसर्स रिलायन्स एनर्जी लिमिटेडच्या पुरवठा क्षेत्रातील, वीज दराच्या पूर्वीच्या उच्च-दाब-२ या वर्गावारीत येणारे आणि आयोगाच्या दिनांक २६ जुलै, २००७ च्या शुध्दिपत्रकानुसार, लघु-दाब-९ वर्गवारीप्रमाणे देयके प्राप्त होणारे, अशा सर्व ग्राहकांनी उपरोक्त विषयावरील त्यांच्या सूचना/हरकती सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५ ( दूरध्वनी- ०२२-२२१६ ३९६४-६५, फॅक्स क्र. ०२२ २२१६ ३९७६) यांना (३ प्रतींमध्ये) व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स/ई-मेलद्वारे **२६ डिसेंबर, २००७** पर्यंत मिळतील, अशा रितीने पाठवाव्यात व त्यामध्ये पाठविणा-याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता, पिन कोड आणि, असल्यास ई-मेलचा, उल्लेख करावा. **एक प्रत संचालक, रिलायन्स एनर्जी लिमिटेड, रिलायन्स एनर्जी सेंटर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०५५ यांचे नावे पाठवावी.** तसेच सूचना/हरकती जर कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने करण्यात येत असतील तर तसे त्यामध्ये नमूद करण्यात यावे. त्याचप्रमाणे, अशा व्यक्तीस आयोगाने त्याचे म्हणणे व्यक्तीशः ऐकून घ्यावे अशी इच्छा असेल तर त्यामध्ये तसे नमूद करण्यात यावे म्हणजे खाली नमूद केल्याप्रमाणे होणा-या जाहीर सुनावणीच्या वेळी त्या व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. या सुनावणीची वेगळी नोटीस देण्यात येणार नाही.

या विषया संदर्भात जाहीर सुनावणी नवीनभाई ठक्कर सभागृह, श्री विलेपार्ले गुजराती मंडळ, श्रध्दानंद रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई- ४०० ०५७ येथे दिनांक ४ जानेवारी, २००८ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.आयोगाने पारित केलेले वर उल्लेखलेले सर्व आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

सही/-
(पी. बी. पाटील)
सचिव, मविनिआ

मुंबई, १४ डिसेंबर, २००७